Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# लेव्हल फाइव्ह आणि समर्थ

20 May 2011, 0027 hrs IST

**SMS NEWS to 58888 for latest updates**

- डॉ. सुधीर निरगुडकर

जिथे संघटितपणे काम करावे लागते म्हणजे राजकारण, समाजसुधारणा, उद्योग-व्यवसाय अशा क्षेत्रांत नेतृत्वाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या संघटित क्षेत्राला अधिक कुशल बनवण्याचे काम व्यवस्थापन शास्त्र करीत असल्याने या शास्त्रात नेतृत्व हा मध्यवर्ती विषय ठरला आहे. १७व्या शतकात आध्यात्मिक पुनरुत्थान घडवून आणणारे समर्थ रामदासस्वामी हे स्वत: एक प्रभावी नेता होते. त्यांनी आपले कार्य सर्वत्र पसरावे म्हणून भारतभरात ११०० मठ स्थापन करून त्या प्रत्येक मठात एक महंत नेमला. हे महंत उत्तम नेते व्हावेत म्हणून वेळोवेळी समर्थांनी आपल्या लेखनातून मार्गदर्शन केले आहे. दासबोधातील उत्तम लक्षण, जाणपण निरूपण, उत्तम पुरुष, महंत लक्षण या समासांतून रामदासांनी जे नेतृत्वाचे धडे दिले आहेत ते आजच्या आधुनिक काळातील व्यवस्थापकांनाही उपयोगी पडणारे आहेत.

जीम कॉलिन्स यांची 'लेव्हल फाइव्ह लीडरशिप' अशीच एक संकल्पना आहे. या व्यवस्थापन नीतीमध्ये हाताखालच्या लोकांचा आब राखणे, नि:स्वार्थीपणे काम करणे, ध्येय गाठण्यासाठी कटिबद्ध असणे हे गुण नेतृत्वात असणे आवश्यक मानले आहे. लेव्हल फाइव्ह नेतृत्व चारित्र्याच्या ताकदीला कौशल्यांची जोड देते. या नेतृत्वाची इच्छाशक्ती दांडगी असतेच; पण हे नेतृत्व विनयशीलही असते. छत्रपती शिवाजी महाराजांचे जे गुणवर्णन समर्थांनी केले आहे ते लेव्हल फाइव्ह नेतृत्वाचेच आहे. ते म्हणतात, निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू। अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी। परोपकाराचिया राशी। अखंड घडती जयासी। तयाचे गुणमहत्वासी। तुळणा कैंची।। समर्थांच्या मते नेतृत्व जनकेंदित असते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे नेत्याच्या कृती आणि उक्तीत एकवाक्यता असेल तरच तो नेता लोकांच्या विश्वासाला पात्र ठरतो. अनेक लोकांना राजी राखल्यानेच संस्थेचा उत्कर्ष होतो हे तत्त्व तो अमलात आणतो, आपल्याला जितके ज्ञान आहे तितके तो लोकांना त्यांच्या कुवतीप्रमाणे देतो. अशा प्रकारे पुष्कळ लायक लोकांना एकत्र करून, त्यांना एका ध्येयाने बांधून, त्यांच्या मदतीने तो संस्थेच्या स्पर्धकांशी असलेले युद्ध समर्थपणे लढतो.

रामदास हे बुद्धिवादावर भर देणारे संत होते. त्यामुळेच इहलोकी परलोकी। बुद्धीयोगची पाहिजे।। अशा शब्दांत बुद्धीचे सामर्थ्य सांगणाऱ्या समर्थांना विचारप्रधान नेतृत्व अपेक्षित होते. बुद्धीसामर्थ्य, विवेकशक्ती, विचार-शक्ती ज्यांच्या ठिकाणी असते अशा लोकांचे समाजातील स्थान मोठे असते हे सांगताना समर्थ म्हणतात, येथे बुद्धीचा प्रकाश। आणीक न चढे विशेष। प्रताप कीतीर् आणि यश। प्राणिमात्रासी।। आधुनिक काळातील व्यवस्थापकांना धोरणात्मकदृष्ट्या विचार करण्यासाठी रोज मिळणाऱ्या माहितीचे विश्लेषण करावे लागते, त्यामुळे विश्लेषणात्मक विचारबुद्धी हेच त्यांचेही मुख्य भांडवल असते.

समर्थांच्या मते नेत्यांत गुणग्राहकता हवी आणि समुदायाकडून कामे करून घेण्याची हातोटी व क्षमता हवी. त्याचबरोबर समर्थ दुसऱ्याच्या मनात काय चालले आहे हे ओळखणाऱ्यालाच उत्तम संघबांधणी येते असे मानतात. ते म्हणतात, जो दुसऱ्याचे अंतर जाणे। देश काळ प्रसंग जाणे। तया पुरुषा काय उणे। भूमंडळी।।

संघटनेच्या ध्येयाप्रमाणे व प्रत्येक वेळेच्या गरजेनुसार, सदस्यांची कुवत ओळखून त्यांना वेगवेगळया कामांत गुंतविण्यासाठी या सदस्यांच्या मनातले मर्म नेत्याने जाणणे आवश्यक असते. याबाबत समर्थ सांगतात, अधिकार पाहोनी कार्य सांगणे। साक्षेप पाहोनी विश्वास धरणे। जीवन किंवा व्यवस्थापन साधे, सोपे, सरळ नसते. त्यात सातत्याने होणाऱ्या बदलांशी जुळवून घेऊन त्यातून वाट काढण्याचे काम नेत्याला करावे लागते. काही वेळा आपत्कालीन घटनांत क्षणार्धात निर्णय घेऊन ते अमलात आणावे लागतात. त्यामुळे नेत्याने न डगमगता, पळ न काढता सावध राहून सर्व शक्याशक्यतेचा विचार करावा हे सांगताना 'अचूक यत्न' या उपदेशात समर्थ म्हणतात, अंतरीच सावधान। उत्तरी अवेवधान। सावरीं प्रसंगमान। यावरी विधीविधान।। नेहमी सर्वतोपरी प्रयत्न आणि सखोल विचार करणाऱ्या चतुर व्यक्तीवरच सुसंधींचा वर्षाव होतो.

या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap

Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service

This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768